जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JUL 2021
सकाळ

# विवेकानंद कॉलेज सर्वसाधारण विजेते

## विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सव; १९ कला प्रकारांचा समावेश

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठातर्फे घेतलेल्या ऑनलाईन ४० व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विविध कला प्रकारात चमकदार कामगिरी करत येथील विवेकानंद कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. माजी कुलगुरू आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषकाचे मानकरी ठरले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे यंदा प्रथमच युवा महोत्सव ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला. युवा महोत्सवात विविध १९ कला प्रकारांचा समावेश होता. विभागवार विजेते असे : वाङ्मय -ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा, श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर व सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर कराड यांना विभागून, नाट्य - ईस्माइलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज सातारा व केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग गोकुळ शिरगाव यांना विभागून दिला आहे. संगीत-देशभक्त रत्नाप्पा कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. नृत्य - श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली. कला-मुधोजी कॉलेज, फलटण. मध्यवर्ती युवा महोत्सवाचे विभागवार विजेतेपद चषक व सर्वसाधारण विजेतेपद चषक प्राप्त महाविद्यालयांना प्रदान करण्याचा कार्यक्रम लवकरच होणार आहे. याबाबत स्वतंत्रपणे महाविद्यालयांना कळविण्यात येईल, असे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

31 JUL 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमोडीटीज मार्केटमधील संधी अवगत करा : वशिष्ट



कोल्हापूर, ता. ३० : 'सोने, चांदीपासून कपाशीपर्यंत वस्तूंवर वायदे बाजार व्यापार हा कमोडीटीज मार्केटमध्ये चालतो. त्याचा लाभ गुंतवणूकदार, छोट्या व्यावसायिकांनी घेतला पाहिजे. कमोडीटीज मार्केटमधील विविध संकल्पना, त्याबाबतचे अद्ययावत ज्ञान वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षकांनी प्राप्त करावे. परताव्याच्या संधी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अवगत कराव्यात,' असे आवाहन मल्टी कमोडीटीज एक्स्चेंज ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आशुतोष वशिष्ट यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, मल्टी कमोडीटीज एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडतर्फे पाचदिवसीय 'कमोडीटीज डेरीव्हेटिव्ह प्रोग्राम' प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केले.

कमोडीटीज मार्केटची सर्वसाधारण पार्श्वभूमी, फ्युचर व ऑप्शन ही डेरीव्हेटिव्ह मार्केटमधील उपकरणे, हेजिंग संकल्पना, किंमत जोखीम व्यवस्थापन, पेमेंट, मार्जीनिंग, सेटलमेंट प्रणाली, ट्रेडर वर्क स्टेशनवरील प्रत्यक्ष बाजारातील प्रात्यक्षिक या विविध विषयावर पाच सत्रांचे आयोजन केले होते. श्री. वशिष्ट, विनीत सिंग कालेर यांनी हे प्रशिक्षण महाविद्यालयातील, विद्यापीठातील शिक्षकांना दिले. डॉ. गांधली खारगे, प्रा. राम मधाळे यांनी अभिप्राय व्यक्त केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले. तेजपाल मोहरेकर यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.

3 1 JUL 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाने भागविली शहराची तहान

## पुराच्या काळात सोळा लाख लिटर पाणी पुरवठा : जनावरांसाठी २५ ट्रॉली गवत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने महापुराच्या कालावधीत शहराला गेल्या पाच दिवसांत सरासरी १६ लाख लीटरचा पाणीपुरवठा केला आहे. तसेच पूरग्रस्त भागातील जनावरांसाठी २५ ट्रॉली गवत देवून मुक्या जनावरांची भूक भागवली आहे. विद्यापीठाने केलेल्या मदतीबद्दल शहरवासियांकडून आभार मानले जात आहेत.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त कादंबरी बलकवडे यांनी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्याशी शहराला पाणी पुरवठा करण्यासंदर्भात चर्चा केली होती. शिवाजी विद्यापीठात भरपूर पाणीसाठा आहे. त्यामुळे गेल्या पाच दिवसात १६ लाख १६ हजार ५०० लीटर पाणी महानगरपालिकेच्या यंत्रणेद्वारे शहराला पुरवठा केला आहे.



कोल्हापूर : विहीरीवरील पाणी व्यवस्थेची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलकुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

विद्यापीठाच्या क्रीडा विभाग परिसरातील विहीरीतील पाण्याची नमुना तपासणी करण्यात आली. हे पाणी पिण्यास योग्य असल्याचे समजताच या विहीरीतील पाणी शहराला पुरवण्यात आले. पाणीपुरवठ्याचे नियोजन अभियांत्रिकी विभागाचे प्रभारी उपकुलसचिव आर. पी. यादव व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे. तसेच पूरग्रस्त भागातील जनावरांसाठी दररोज पाच ट्रॉल्या अशा २५ ट्रॉल्या गवत पुरवले आहे. पाणी व चारा पुरवठा व्यवस्थापनाची पाहणी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केली आहे. महापालिकेकडून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत विद्यापीठ पाणी पुरवठा करणार आहे.

### नागरिकांकडून समाधान

शिवाजी विद्यापीठ परिसरात जलसंवर्धन केल्यानेच जल साठवणुकीचे विविध प्रयोग केले आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या परिसरात सुमारे ३२ कोटी लिटर पाणी साठविले जाते. म्हणून महापुरामध्येही शहराला पाणीपुरवठा केला जात आहे. याबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहेत.